# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(विद्या विभाग)

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ जमनालाल बजाज प्रशासकिय भवन महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर, विद्यापीठ कॅम्पस चौक ते अंबाझरी टी–पॉइंट मार्ग, नागपूर – ४४० ०३३.


अधिसूचना क्र. /रातुमनावि/विद्या/२३/५६३  दिनांक: ~~३०~~ ३१/८/२०२३

## :: अधिसूचना ::

सर्व संबंधितांच्या माहितीकरीता सूचित करण्यात येते की, शासनाने दिनांक २० एप्रील २०२३ रोजी निर्गमित केलेल्या **NEP-2020** मार्गदर्शक सुचनेनुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या चारही विद्याशाखेअंतर्गत येणाऱ्या पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा योजना,अभ्यासक्रमिका व प्रवेश पात्रतेबाबत मार्गदर्शक सूचना तयार करून सादर केल्या होत्या, यास दिनांक २२ मे २०२३ रोजी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेने, दिनांक २५ मे २०२३ रोजी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेने व दिनांक ३ जुन २०२३ रोजी आंतरविद्याशाखेने मान्यता प्रदान करून विद्यापरीषदेकडे शिफारशीत केले होते. तसेच मानवविज्ञान विद्याशाखेच्या वतीने मा. कुलगुंरू महोदयांनी विद्यापरीषदेकडे शिफारशित केले होते. यास विद्यापरीषदेने दिनांक ५ जुन २०२३ रोजी मान्यता प्रदान केलेली आहे.

करीता **NEP-2020** नुसार तयार करण्यात आलेल्या **B.Sc., B.C.A., B.Com, B.B.A., B.Sc. (Finance), B.Libs, B.A. in Mass Communication** अभ्यासक्रमाच्या अभ्यासक्रमिका, परीक्षा योजना व प्रवेश पात्रतेबाबत नियमावली तसेच **B.A.** अभ्यासक्रमाच्या परीक्षा योजना व नियमावली. २०२४–२५ पासून लागु करावयाचा असल्याने सदर नियमावली परीक्षा योजना व अभ्यासक्रमीका विद्यापीठाच्या संकेतस्थळावर तात्पुरत्या स्वरूपात प्रकाशीत करण्यात आलेल्या आहेत. यात शासनाने काही बदल व सुधारणा सुचविल्यास त्यानुसार बदल करून सुधारीत प्रती प्रकाशित करण्यात येतील. जर कोणत्याही सुधारणा शासनातर्फे प्राप्त झाल्या नाहित तर याच परीक्षा योजना, अभ्यासक्रमिका व नियमावली सत्र २०२४–२५ पासुन लागु राहतील याची संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी.

(टिप:– उपरोक्त नियमावली, परीक्षा योजना व अभ्यासक्रमिका विद्यापीठाच्या, (www.nagpuruniversity.org) या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत).

मा. कुलगुरुंच्या आदेशान्वये

(डॉ. राजु हिवसे)
कुलसचिव

प्रतिलिपी माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित:

१. सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य व विभागप्रमख
२. मा. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा
३. सर्व अभ्यासमंडळ सदस्य
४. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ
५. उपकुलसचिव (परीक्षा,पुर्व व परीक्षा उपरांत),मा.कुलगुरूंचे कार्यालय,म.वि.वि.
६. सहायक कुलसचिव (गोपनीय), व्या.परीक्षा,सामान्य परीक्षा व चौकशी
७. अधिक्षक ( निकाल विभाग),
८. समन्वयक,आय.टी. सेल

} राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,

(डॉ.राजेंद्र उतखेडे)
उपकुलसचिव (विद्या)